# आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान

*डॉ. रविंद्र देवरे

कोणत्याही मोठ्या व्यक्तीचे कार्य त्यांच्या जडणघडणीवर असते. जडणघडणीच्या वेळीची परिस्थिती व त्या व्यक्तीची वैचारिक परिपक्वता ह्यातून त्या व्यक्तीचे व्यक्तीमत्व जगापुढे येत असते. यशवंतरावांचे व्यक्तिमत्व इतके परिपक्त होते की, कोणत्याही क्षेत्रात कोणत्याही परिस्थितीत ते आपल्या व्यक्तिमत्वाची छाप सोडत असत.

सोळाव्या वर्षीच काँग्रेस चळवळीत स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतलेले यशवंतराव अत्यंत विचारी स्वभावाचे होते. मुबलक वाचन, चिंतन मनन करणाऱ्यांपैकी ते एक होते. काँग्रेस समाजवादी पक्ष व रॉयवादाशी त्यांची काही काळ निश्चितच जवळीक होती. विचारांना व्यवहाराची जोड अशी त्यांची जीवनपध्दती होती. म्हणूनच द्विधा मनस्थितीत उत्पन्न झाल्यास ते नेहमी सामान्य कार्यकर्त्यांच्या मनाचा कानोसा घेत. त्यातूनच त्यांनी गांधी-नेहरूंचे नेतृत्व असलेल्या काँग्रेस म्हणजेच राष्ट्रीय प्रवाह कधीच सोडला नाही. हे सूत्र त्यांनी आपल्या राजकीय जीवनात अनेकदा सत्तेची संधी प्राप्त होऊनही अखेरपर्यंत निष्ठापूर्वक पाळले. अशी वैचारिक निष्ठा आजकाल क्वचितच आढळून येते.

स्वातंत्र्यानंतर त्यांचे नेतृत्व अधिकच बळकट होत गेले. १९५६ नंतरचा महाराष्ट्र घडवितांना तो त्यांनी जाणीवपूर्वक कृषी, औद्योगीक समाजरचनेच्या मुलभूत तत्वाआधारे घडविला. १९३७ ते १९६२ या काळात बाळासाहेब खेर, मोरारजी देसाई आणि यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचे नेतृत्व केले. या तिन्ही नेत्यांपैकी यशवंतराव चव्हाण यांची भूमिका ही पुष्कळशी वास्तववादी व पुरोगामी वाटते. महाराष्ट्राच्या जडणघडणीची प्रक्रिया ही त्यांच्या अनेक महत्वपूर्ण निर्णयांमधून निश्चितच अधोरेखीत होते ती पुढीलप्रमाणे.

**यशवंतरावांचे विचारधन:-**यशवंतरावांची राजकीय नीती ज्या प्रमुख तीन स्तंभांवर आधारित होती ती म्हणजे लोकशाही, समाजवाद व नियोजन. यशवंतरावांचा लोकशाहीवरील विश्वास फक्त वोट बँक म्हणून नव्हता तर लोकशाहीत लोकांना संघटित करून ह्या संघशक्तीकडून त्यांचा आर्थिक, सामाजिक विकास कसा करता येईल तो पाहणे होय. लोकशाही ही जीवनावर अधिष्ठीत आहे व वैचारिक स्वातंत्र्याची ती एक प्रकारची मानसिक तयारी आहे असे त्यांचे लोकशाही विषयक मत होते. यशवंतरावांचा दुसरा वैचारिक आधारस्तंभ म्हणजे समाजवाद. काँग्रेसने समाजवादी रचनेचा संकल्प करावा असा त्यांचा आग्रह होता. महाराष्ट्रात सामाजिक समता व न्याय कसा नांदेल ह्यावर त्यांचा कटाक्ष असे. ग्रामीण व गरीब तसेच समाजातील खालच्या स्तरावरील लोकांपर्यंत निरनिराळ्या योजना व त्यांचे फायदे कसे मिळू शकतील यासाठी त्यांनी अनेक योजना आखल्यात व त्यांची पारदर्शीपणे अंमलबजावणी घडवून आणली.

यशवंतरावांचा तिसरा वैचारिक स्तंभ म्हणजे नियोजन. महाराष्ट्राच्या विकासासाठी त्यांनी नियोजनाच्या निश्चित दिशा आखल्या होत्या. अधिकारी तसेच पदाधिकारी हे जनतेचे सेवक असतात, त्या सर्वांनी जनतेचे प्रश्न वेळेवर व पोटतिडकीने सोडवावेत ह्या त्यांच्या कृतीशील आव्हान व कार्यपध्दतीमुळे तत्कालीन प्रशासन कमालीचे कार्यक्षम बनले होते.

**पुरोगामी समाजकारण:-** आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतरावांची पुरोगामी दृष्टी तितकीच महत्वाची ठरते. महाराष्ट्राला एक शतकापूर्वी महत्मा फुले, शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जो समतेचा विचार दिला तो शासनामार्फत कार्यान्वित करण्याचे कार्य यशवंतरावांनी केले. १९५८ मध्ये महार वतन ही पध्दत नाहीशी करण्याचा ऐतिहासीक निर्णय त्यांनी घेतला, अस्पृश्यांना ज्या सवलती उपलब्ध आहेत, त्या सर्व त्यांनी नवबौध्दांनाही उपलब्ध होती हा निर्णय सर्वप्रथम महाराष्ट्रात त्यांनी घेतला. हा निर्णय केंद्र सरकारला घ्यायला १९९२-९३ हे वर्ष उजाडले. ह्या सारख्या अनेक निर्णयांमधून दलित समाजाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रामाणिक प्रयत्न त्यांनी केले. एवढेच नव्हे तर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या दिवशी त्यांनी ब्राह्मण समाजातील जळीत घरांच्या प्रकरणासंबंधीचे घेतलेली कर्जे माफ करण्याची घोषणा केली. अशा प्रकारच्या विविधांगी निर्णयांमधून सामाजिक परिवर्तन व सामाजिक समानता जोपासण्याचा त्यांचा प्रयत्न किती प्रामाणिक व पुरोगामी स्वरूपाचा होता हे स्पष्ट दिसते. बिहार, उत्तरप्रदेश व उत्तर हिंदुस्थानात हे प्रश्न योग्य दृष्टीने गेल्या ४०-५० वर्षात न् हाताळल्यामुळे तेथे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत व त्या राज्यांमध्ये भयंकर अस्थिर सामाजिक स्थिती आजही दिसुन येते.

**कृषी औद्योगिक समाजरचना:-** यशवंतरावांना कृषी औद्योगिक समाजरचना अभिप्रेत होती. त्यादृष्टीने त्यांनी ग्रामीण भागात शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग सुरु करावेत की, ज्यामुळे शेतकऱ्यांच्या कच्च्या मालाला हक्काची बाजारपेठ मिळेल. तसेच वाहतुकीचा खर्च वाचेल, लोकांचे परिश्रम वाचतील. एवढेच नव्हे तर ग्रामीण

* सी. गो पाटील महाविद्यालय, साक्री जि. धुळे, महाराष्ट्र

भागात कृषीपुरक उद्योग सुरु झाल्याने स्वत:च्या भागातील स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होतील व त्यांना शहराकडे रोजगारासाठी धाव घेण्याची गरज भासणार नाही. आज महाराष्ट्रात आणि विशेषत: दक्षिण महाराष्ट्रात, शेती संबंधी किंवा शेतीवर आधारित जे उद्योगधंदे प्रस्थापित झालेले दिसतात व ज्यामुळे झपाट्याने ग्रामीण विभागाची उल्लेखनीय प्रगती झालेली आहे त्याचे सर्व श्रेय यशवंतराव चव्हाण यांनाच आहे. विकासाची व्यापकता वाढावी म्हणून महाराष्ट्रात उद्योगधंदे निरनिराळ्या भागात कार्यान्वीत व्हावेत त्यासाठी यशवंतरावांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या करकीर्दीत सिकॉम, एम.आय.डी.सी, एम.एस.एफ.सी. सारख्या संस्थांचे जाळे महाराष्ट्राच्या जिल्हा, तालुका व इतर योग्य ठिकाणी पसरविण्याचेही कार्य केले. ज्यामुळे आजच्या विकेंद्रीकरणाच्या संकल्पनेला निश्चितच चालना मिळुन ती महाराष्ट्राला मदतीची ठरत आहे. शेती उद्योग व सहकार यांचे परस्पर संबंध प्रस्थापित होण्यासाठी ते अधिक विकसीत होण्यासाठी त्यांनी आर.जी.सरश्या, वैकुंठभाई मेहता, धनंजय गाडगीळ यांच्यासारख्या तज्ञांची वेळोवेळी मदत घेतली.

**शैक्षणिक कार्य:-** शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन असल्यामुळे शिक्षणातून शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागाचा सर्वांगिण विकास व्हावा, सुशिक्षीत समाजनिर्मितीसाठी यशवंतरावांनी भगीरथ प्रयत्न केले. त्यांच्यामते -स्वत:भोवती व जगाभोवती घडणाऱ्या गोष्टींमध्ये संगती लावता त्याचा आपल्या जीवनावर व्यक्तिमत्वावर काय परिणाम घडतो हे समजावून घेणे म्हणजे शिक्षण होय. शिक्षणाच्या क्षेत्रात क्रांती घडवून आणणाऱ्या यशवंतरावांनी इ.बी.सी.सवलत लागू करून अनेक गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची द्वारं उघडी करून दिलीत. बौध्द, दलित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, प्रत्येक गावात स्वत:च्या मालकीच्या इमारतीसह प्राथमिक शाळा, आदिवासी मुला-मुलींसाठी आश्रमशाळांची निर्मिती, मुलींच्या शिक्षणासाठी खास सवलती, सातारा येथे सैनिकी शाळा, ग्रामीण भागातील व बहुजन समाजाला आपल्या जवळपास शिक्षणाच्या सोयी उपलब्ध व्हाव्यात म्हणून खाजगी संस्थांना माध्यमिक शाळा व वरिष्ठ महाविद्यालयांची अनुदान तत्वावर स्थापना घडवून आणल्यात. कोल्हापूर व औरंगाबाद येथे स्वतंत्र विद्यापीठांची स्थापना केली. नागपूर व कराड येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांची तसेच मराठवाड्यात औरंगाबाद येथे वैद्यकिय महाविद्यालय सुरु केली. स्वत: रयत शिक्षण संस्थेसारख्या विशाल शैक्षणिक संस्थेचे जवळपास २५ वर्षे अध्यक्ष राहिले. एकूणच शिक्षण राष्ट्रीय विकासाचे एक प्रभावी माध्यम मानण्याची दूरदृष्टी असलेल्या यशवंतरावांनी शिक्षणासाठी अधिकाधिक सवलती देवून हा प्रवाह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचविण्याचा प्रयत्न केला.

**सारांश:-** यशवंतरावांना महाराष्ट्राच्या समाजसुधारकांच्या पुरोगामी विचार परंपरेतील एक अविष्कार म्हणून संबांधले जाते. ग्रामीण गरीब जनता डोळ्यासमोर ठेवून त्यांच्या हिताचेच निर्णय त्यांनी नेहमी घेतले. शिक्षण, शेती, सहकार, उद्योग क्षेत्रात त्यांनी क्रांतीकारी परिवर्तन घडविले. कारभार स्वच्छ व वक्तशीर होण्यासाठी कुठल्याही गोष्टींशी त्यांनी तडजोड केली नाही. प्रशासनात त्यांनी उत्साहाचे वातावरण निर्माण केले. त्याला व्यवहारी व मानवतेचा दृष्टीकोन प्राप्त करून दिला. मुख्यमंत्रीपदाच्या वाटचालीत त्यांच्या कर्तृत्वाची प्रतिमा खुलून उठली. तत्कालीन पंतप्रधान नेहरूंनीही त्यांच्या कार्याचा गौरव एका जाहीर सभेतून केला होता. सर्वोदयवादी नेते जयप्रकाश नारायण यांनी तर यशवंतरावांची देशातील सर्वोत्तम मुख्यमंत्री म्हणून प्रशंसा केली. महाराष्ट्राला अस्सल पुरोगामी व समृध्द राज्य बनविण्याचा त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच त्यांना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हटले आहे.

## संदर्भ ग्रंथ

१. भूमिका : चव्हाण यशवंतराव, प्रेस्टिज प्रकाशन, पुणे २. महाराष्ट्राचा भाग्यविधाता : नेर वा.ए., नेरकर प्रकाशन, नाशिक ३. शब्दांचे सामर्थ्य : प्रधान राम, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई ४. यशवंतराव : इतिहासाचे एक पान : जोशी रामभाऊ, केसरी प्रकाशन, पुणे ५. यशवंतराव चव्हाण : काळे बाबुराव, चरित्र्य प्रकाशन, पुणे ६. यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार : महानोर ना.धो., यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई ७. ऋणानुबंध : चव्हाण यशवंतराव, प्रेस्टिज प्रकाशन, पुणे

**विशेषांक:-** १. दै.मुंबई सकाळ : यशवंतराव चव्हाण श्रध्दांजली अंक (सर्व विशेषांक) २ डिसेंबर १९८४. २. दै.ऐक्य : यशवंतराव चव्हाण षष्ठपूर्ती विशेषांक, सातारा, १२ मार्च १९७३. ३. मनोहर : यशवंतराव चव्हाण स्मृती विशेषांक, पुणे, मार्च १९८५. ४. रविवार लोकसत्ता : यशवंतराव चव्हाण विशेषांक, मुंबई, दि.२ डिसेंबर १९८४. ५. लोकराज्य : यशवंतराव चव्हाण स्मृती विशेषांक, मुंबई, मार्च १९८५.